


RNI NO-MAHMAR/2022/90217

# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com

Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : १९० वा शुक्रवार दि १२ सप्टेंबर २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# ठाकरे बंधूंची भेट अन् मुंबई निवडणुकीचं समीकरण; शिवतीर्थावर काय घडलं?

वृत्तसंस्था/मुंबई

वरळी येथील मेळाव्यानंतर मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या मनोमिलनाच्या चर्चा माध्यमांमध्ये खूप जोरात सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे. ठाकरे बंधूंची पहिली भेट ही वरळी येथील मेळाव्यात, दुसरी भेट मातोश्री येथील उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसाचं निमित्ताने, तिसरी भेट ही राज ठाकरेंच्या शिवतीर्थ या निवासस्थानी गणेश चतुर्थी निमित्त तर चौथी भेट ही शिवतीर्थ याच ठिकाणी राज ठाकरेंच्या मातोश्री यांचं उद्धव ठाकरेंना बोलावणं आल्याने झाली. या भेटींच्या निमित्ताने राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंमध्ये विचारमंथन होऊन आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठीची चर्चाही अंतिम टप्प्यात पोहचत, अशी माहिती विश्वसनीय सूत्रांकडून देण्यात आली आहे. उद्धव ठाकरे शिवतीर्थ या राज ठाकरेंच्या निवासस्थानी त्यांच्या मातोश्री कुंदा ठाकरे यांना भेटायला गेल्याचा दावा ठाकरेंच्या शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी केला असला तरी उद्धव यांची राज ठाकरेंसोबत राजकीय चर्चा झाल्याची प्राथमिक माहिती आहे. दोन्ही ठाकरे बंधूंसाठी मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुका राजकीय अस्तित्वाची लढाई मानली जाते आहे. या पार्श्वभूमीवर यंदा होणारा दसरा मेळावा हा उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेकरिता जीव की प्राण समजला जातो आहे. शिवसेनेच्या फुटीनंतर उद्धव ठाकरेंना आगामी मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत राजकीय यश मिळवून परत एकदा स्वत:ला सिद्ध करावं लागणार आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाकरिता दसरा मेळावा हा कार्यकर्त्यांमध्ये उत्साह पेरणारा असतो. बाळासाहेब ठाकरे यांनी याच दसरा मेळाव्याच्या माध्यमातून मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत सत्ता खेचून आणल्याची अनेक उदाहरणं आहेत. मात्र ठाकरे बंधूंच्या मनोमिलनाच्या पार्श्वभूमीवर २०२५ वर्षी होणारा दसरा मेळावा हा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षासाठी विशेष समजला जात आहे. असं म्हटलं जात आहे की राज ठाकरेंना उद्धव ठाकरे दसरा मेळाव्या करिता निमंत्रित करतील. मात्र शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या या मेळाव्यासाठी राज ठाकरे ज्यांचा स्वत:चा



पक्ष आहे, ते हजेरी लावणार का? हा प्रश्न अजूनही अनुत्तरित आहे. मनसेचा गुढीपाडवा मेळावा दरवर्षी पार पडतो. या अनुषंगाने जर राज ठाकरे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या व्यासपीठावर दसरा मेळाव्यानिमित्त गेले तर माध्यमं आणि कार्यकर्त्यांचं पूर्ण लक्ष राज ठाकरेंच्या भाषणाकडे असेल. परिणामी राज ठाकरेंचं भाषण कौशल्य पाहता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उद्धव ठाकरेंच्या भाषणाकडे दुर्लक्ष होईल आणि दसरा मेळाव्याचा उद्देश साध्य होणार नाही, असं पण खासगीत काही पदाधिकारी बोलताना सांगत आहेत. दरम्यान, दादर येथील छत्रपती शिवाजी महाराज पार्कवर होणाऱ्या दसरा मेळाव्याला आगामी काही दिवसातच जर निमंत्रण मिळालं तर राज ठाकरे येणार की नाही, हे पाहणं महत्त्वाचे ठरणार आहे.

# अखेर मेहकर च्या गवळीपुरा येथील शादीखान्याचे आमदार सिद्धार्थ खरात यांनी केले उदघाटन

जनसंचलन/मेहकर

मेहकर-लोणार विधानसभा मतदारसंघाचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे आमदार सिद्धार्थ खरात यांच्या हस्ते मेहकरच्या गवळीपुरा येथील शादीखान्याचे भूमीपूजन आमदार सिद्धार्थ खरात यांनी केले. मेहकर येथिल गवळीपूरा येथे शादींखाना करण्याची मागणी येथिल नागरिकांनी अनेक वर्षापासून केली होती . या साठी विशेष नागरी सुविधा अंतर्गत रू ४० लक्ष खर्चाच्या कामांची निविदा मंजूर होती . तसेच बालाजी कन्स्ट्रक्शन ला कामाची निविदा देखिल देण्यात आली होती परंतु तरिही नगरपरिषदेच्या ढिसाळ कारभारामुळ् शादीखान्याचे काम सुरू होऊ शकले नव्हते. या संदर्भात गवळीपुरा येथिल नागरिकांनी आमदार खरात यांच्या कडे या कामासाठी सतत पाठपुरावा सुरू ठेवला होता . त्यानुसार आज दिनांक ९ सप्टेंबर २०२५ रोजी या कानाचे भूमीपूजन आमदार सिद्धार्थ खरात यांनी आज केले . या प्रसंगी मेहकर नगरपालिका प्रशासक रामराजे कापरे, शहर प्रमुख किशोर गारोळे, तालुका प्रमुख निंबाजी पांडव, युवासेना तालुका अधिकारी ॲड. आकाश घोडे, ॲड. संदीप गवई, संदीप गारोळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे उपजिल्हा प्रमुख निसार अन्सारी, रफिक हसन गवळी, छोटू गवळी, इमाम गवळी, बापू पर्सुवाले, रहीम चौधरी, जंगली रोहिवाले, हसन पिरु नवरंगाबादी, फिरोज रहमान, निन्नु भाई यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व गवळीपुरा येथील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. गवळीपुरा परिसर गेल्या अनेक वर्षांपासून विविध समस्यांनी ग्रस्त होता. घाणीचे साम्राज्य, पायाभूत सुविधांचा अभाव या कारणांनी नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. निवडणुकीत दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी आमदार खरात सातत्याने प्रयत्नशील आहेत. त्याचाच एक भाग म्हणून ४० लक्ष रुपये खर्चाचा शादीखाना तसेच १० लक्ष रुपयांचा संरक्षणभिंतीचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या कामामुळे गवळीपुरातील खुल्या भूखंडात साचलेली घाण दूर होऊन एक भव्य व आधुनिक इमारत उभी राहणार आहे. यामुळे नागरिकांची दीर्घकाळची समस्या दूर होऊन सोयीसुविधांनी युक्त जागा उपलब्ध झाली आहे. नागरिकांच्या मुलभूत गरजांकडे लक्ष देत समस्यांचे निराकरण करण्याचे काम आमदार खरात यांनी हाती घेतल्यामुळे गवळीपुरा परिसरात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. सदर कामाच्या वॉल कंपाऊंट साठी अधिकचा निधी लागल्यास उपलब्ध करून देण्यात येईल असेही आमदार सिद्धार्थ खरात यांनी सांगितले.



# ...कार्यसंस्कृती व सौजन्य...


## संपादकीय लेख

काही दिवसांपूर्वी सहायक पोलिस अधीक्षक या पदावर असलेल्या एका महिला आयपीएस अधिकाऱ्यास राज्याच्या उपमुख्यमंत्र्यांनी त्या करीत असलेली कारवाई थांबविण्याचे आदेश मोबाइलवरून दिले, अशा स्वरूपाच्या तथाकथित बातम्या आणि क्लिप्स प्रसारमाध्यमे, समाजमाध्यमे आणि वृत्तपत्रांत आल्या व त्यावर उलटसुलट चर्चा झाली. त्यानंतर, समाजमाध्यमांवरील व्हिडिओसंदर्भात स्पष्ट करतो, की माझा उद्देश कायद्याच्या अंमलबजावणीत हस्तक्षेपाचा नव्हता, तर परिस्थिती शांत ठेवण्याचा होता. पोलिस दल व महिला अधिकाऱ्यांविषयी मला सर्वोच्च आदर आहे. कायद्याचे राज्य माझ्यासाठी सर्वोच्च असून पारदर्शक कारभार व सर्व बेकायदा कृत्यांवर कठोर कारवाईस मी कटिबद्ध आहे, असे उपमुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. मुख्यमंत्र्यांनीदेखील या प्रकरणाची दखल घेतली असून, या प्रकरणात सोलापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांकडून याबाबत वस्तुस्थिती निदर्शक अहवाल मागवलेला आहे, असे त्यांनी सांगितले. या प्रकरणात सर्वसामान्यांच्या मनात, राज्याचे उपमुख्यमंत्री एका साध्या सहा. पोलिस अधीक्षकांना आदेश देऊ शकत नसतील, तर ती कसली लोकशाही? किंवा चुकीचे काम होत असेल तर ते थांबविणाऱ्या प्रामाणिक अधिकाऱ्यावर दबाव आणणे हे कसले सरकार असे परस्परविरोधी प्रश्न निर्माण होणे साहजिकच आहे. त्यामुळे याबाबतची वस्तुस्थिती समोर येणेही तितकेच गरजेचे आहे. पूर्वी राजेशाहीत राजा सांगेल तो आदेश असे. आता लोकशाहीत एक संविधानात्मक आणि त्या अंतर्गतचे कायदे आणि नियमांच्या चौकटीत सरकार व प्रशासन चालते. त्यात प्रत्येकाचे अधिकार आणि कर्तव्य याबरोबरच सरकारी यंत्रणा कशी चालावी, याबाबत वैधानिक तरतुदी असतात. साधारणपणे या सर्व बाबी दैनंदिन व्यवहारांत सर्वांकडून पाळल्या जातात. सरकार हे लोकप्रतिनिधींचे बनलेले असते आणि नोकरशाही ही त्यांना पूरक व्यवस्था असते. सरकार हे विधिमंडळामार्फत जनतेला जबाबदार असते. संविधानाच्या चौकटीत काम करणे त्यांना बंधनकारक असते. शिवाय त्यांचेच नोकरशाहीवरही नियंत्रण असते. याकरिता संविधानातील अनुच्छेद १६६अंतर्गत राज्य सरकारचे व्यवहार कसे चालावेत, यासाठी तरतूद आहे. महाराष्ट्रात त्या अंतर्गत १९७५ मध्ये महाराष्ट्र सरकारची अधिकृत कार्य नियमावली लागू करण्यात आली. त्यानुसार, राज्यात किती खाती असावीत, त्या खात्यांकडे कोणते विषय असावेत यांची वैधानिक तरतूद आहे प्रत्येक खात्याला एक मंत्री व त्या खात्यावर त्यांचे नियंत्रण असते. प्रत्येक खात्यासाठी प्रशासकीय प्रमुख म्हणून एक सचिव असावेत, अशीही तरतूद आहे. प्रत्येक खात्याच्या क्षेत्रीय यंत्रणेवर सचिवांचे दैनंदिन पर्यवेक्षण असावे आणि त्या खात्यांचे परिचलन व्यवस्थित होईल, कायद्यांची आणि धोरणांची अंमलबजावणी होईल इत्यादी बाबतीत सर्व जबाबदाऱ्या सचिवावर असतात. सचिवाखालोखाल राज्यस्तरीय विभाग प्रमुख, विभागीय आयुक्त किंवा तत्सम नामाभिधान असलेले वरिष्ठ अधिकारी आणि त्यांच्या अंतर्गत विभागीय पातळी, जिल्हा पातळी, तालुका पातळी, शहर आणि ग्राम पातळी अशा स्तरांवर वेगवेगळ्या दर्जांचे अधिकारी आणि यंत्रणांचे जाळे आहे. या यंत्रणांना आणि अधिकाऱ्यांना विशिष्ट कायदे व नियमांतर्गत अधिकार व जबाबदाऱ्या दिलेल्या असतात. ते त्या योग्य पार पाडत आहेत का, हे पाहण्याची जबाबदारी विभाग प्रमुख आणि सचिव यांची पर्यवेक्षकीय अधिकारी म्हणून असते. ही एक देखरेख-श्रृंखला वैधानिकरीत्या अस्तित्वात आहे. एखाद्या खात्याच्या मंत्र्यांना त्यांच्या क्षेत्रीय यंत्रणेला काही आदेश द्यावयाचे असल्यास ते सचिवांना कळवतील आणि मग सचिव त्यांच्या स्वाक्षरीने क्षेत्रीय यंत्रणांना कळवतील, अशी व्यवस्था आहे. हे आदेश वैधानिकदृष्ट्या सुसंगत आहेत का, हे तपासण्याची जबाबदारी सचिवांची असते. ते आदेश कायदे, नियम, धोरणे, न्यायालयीन आदेश इत्यादीशी विसंगत असल्यास मंत्र्यांच्या निदर्शनास आणण्याची जबाबदारी सचिवावर असते. अर्थात दैनंदिन व्यवहारात प्रत्येक गोष्ट मंत्र्यांनी सचिवांना लेखीच देणे शक्य होईल, असे नसते. त्यामुळे मंत्र्यांचे तोंडी आदेश नंतर सचिवांनी फाईलवर नमूद करून, आपले तोंडी आदेश अमुक अमुक आहेत आणि अंमलबजावणीसाठी ते क्षेत्रीय यंत्रणाकडे पाठविण्यात येत आहेत किंवा त्यांची अंमलबजावणी करणे शक्य नसल्याने आपणास कळवण्यात येत आहे, असे सांगणे वर्तणूक नियमांनुसार अभिप्रेत आहे. एकंदरीतच, जनतेसाठी प्रशासकीय व्यवस्था निकोप राहून कोणावरही अन्याय होणार नाही, यासाठी या सर्व तरतुदी अस्तित्वात आहे. एखाद्या मंत्र्यांना दुसऱ्या खात्यामध्ये काही काम असेल, तर ते त्यांनी संबंधित खात्याच्या मंत्र्यांना सांगणे कार्य नियमावलीप्रमाणे अत्यावश्यक असते. ते इतर खात्याच्या सचिवांना किंवा क्षेत्रीय यंत्रणांना परस्पर त्यांचे तोंडी किंवा लेखी आदेश देऊ शकत नाहीत, किंवा कामे सांगू शकत नाहीत. तसे झाल्यास ती प्रशासकीय अराजकता ठरेल. महाराष्ट्रामध्ये याबाबत प्रशासन अत्यंत निकोप असून कोणतेही मंत्री इतर खात्याच्या यंत्रणांना असे आदेश देत नाहीत, अशी संस्कृती, परंपरा जोपासली गेलेली आहे. अर्थात यामध्ये कार्यसंस्कृतीची एक मोठी गल्लत झालेली आहे. राज्यात पालकमंत्री नावाची एक व्यवस्था प्रत्येक जिल्ह्याला निर्माण केलेली असून त्या पालकमंत्र्यांचे कामकाज हे नियोजन समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांना जो निधी आलेला आहे, त्या निधीचे व्यवस्थित वितरण आणि त्यायोगे होणाऱ्या विकास कामांची अंमलबजावणी इथपर्यंतच कायद्याने मर्यादित आहे. पण राज्यात अशी एक संस्कृती निर्माण झालेली आहे की, संबंधित जिल्ह्याचे पालकमंत्री हे त्या जिल्ह्यातील सर्व खात्यांच्या यंत्रणांना नियोजन समितीच्या कार्यक्षेत्राबाहेरील कामकाजाबाबत देखील असंविधानिक नियंत्रण, अनाठायी दबाव, आदेश देऊन आपल्या खात्याव्यतिरिक्त इतर खात्यांचेदेखील नियंत्रण करतात. ही बाब संविधानांतर्गत तयार करण्यात आलेल्या सरकारी कार्य नियमावलीशी विसंगत आहे. या कार्य नियमावली विसंगत संस्कृतीमुळे राज्यातील प्रशासकीय व्यवस्थेचे किती विदारक स्वरूप तयार होते, ते आपण बीड जिल्ह्यामध्ये जी परिस्थिती निर्माण झालेली आहे त्यावरून सर्वच जाणतो आहोत. त्यामुळे, पालकमंत्र्यांनीदेखील नियोजन समितीच्या व्यतिरिक्त खात्यावर ते नियंत्रण आणणे म्हणजे त्या खात्याच्या मंत्र्यांच्या अधिकारावर अतिक्रमण करण्यासारखे आहे.










The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# सोलापुरात रात्रीत ढगफुटीसदृश पाऊस; जनजीवन विस्कळित, घरे, शेती, रस्ते पाण्यात

**सोलापूर:** सोलापूर शहर आणि जिल्ह्यात गुरुवारी मध्यरात्रीच्या सुमारास झालेल्या ढगफुटीसदृश पावसाने पुरती दाणादाण उडाली असून, जनजीवन पुरते विस्कळित झाले आहे. सोलापुरात केवळ तीन तासांत चार इंच पाऊस झाला. सकाळी साडेआठ वाजता संपलेल्या (११८.३ मिलीमीटर) मुसळधार पावसाने ग्रामीण भागालासुद्धा चांगलेच झोडपून काढले आहे. सोलापूर शहरातील घरे आणि रस्ते पाण्यात असून, महामार्गाला तळ्याचे स्वरूप आले आहे. सोलापूर शहरातील विडी घरकुल, शेळगी, अक्कलकोट रस्ता आदी भागाला पावसाचा मोठा तडाखा बसला. महापालिकेचे प्रशासन अधिकारी विठ्ठल ढेपे यांनी खबरदारीचा उपाय म्हणून या भागातील शाळांना गुरुवारी सुट्टी जाहीर केली आहे. सोलापुरात पुढील चार दिवस मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

शहरातून वाहणारी आदिला नदी दुथडी भरून वाहू लागली असून, परिसरातील नागरिकांना दक्षतेचा इशारा देण्यात आला आहे. ग्रामीण भागातील अक्कलकोट, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर आदी ठिकाणी शेतीला मोठा फटका बसला असून, बळीराजाचे कंबरडे मोडले आहे. अक्कलकोट; तसेच होटगी भागात ५० ते ६० मिलीमीटर पाऊस झाल्याचा अंदाज आहे. ओढ्याचे पाणी महामार्गावर येऊन सोलापूर - धुळे मार्गावरील वाहतूक धीम्या गतीने सुरू आहे.सोलापूर शहरातील शिवगंगानगर येथे पावसाचे पाणी घरात शिरल्यामुळे



नागरिक संतापले. सोलापूर महापालिकेला तक्रार करूनही, दोन वेळा जनता अदालतीमध्ये आयुक्तांना निवेदन देऊनही शिवगंगा नगरमधील नागरिकांच्या तक्रारीची दखल घेतली गेलेली नाही. त्यामुळे गुरुवारी लोकांनी त्यांच्या घरासमोर पावसाच्या साचलेल्या पाण्यात उभे राहून फुलांचा वर्षाव करून शांततेने आंदोलन केले. महापालिकेने त्वरित दखल घेऊन समस्या सोडवावी; अन्यथा आगामी महापालिकेच्या मतदानावर बहिष्कार घालू, असा इशारा देण्यात आला.

## शरद पवारांच्या राष्ट्रवादीतील अंतर्गत वाद चव्हाट्यावर, मेळाव्यात प्रदेशाध्यक्षांसमोर वातावरण टाईट; काय घडलं?

**नंदुरबार :** शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्या उपस्थितीत शहादा येथे सुसंवाद मेळाव्याच्या आयोजन करण्यात आले होते. मात्र या मेळाव्यात प्रदेशाध्यक्ष समोरच संघटनेतील वाद चव्हाट्यावर आला आहे. यावेळी पदाधिकाऱ्याने आपला पक्षाचा पदाधिकारी हा भाजपाचा व्हाट्सअप ग्रुपचा ॲडमिन असल्याचा आरोप करत. आपल्या पक्षातील लोक भाजपासाठी काम करत असून या मेळाव्यात लोक आले नाहीत तर आणले गेले असल्याचा गंभीर आरोप आदिवासी सेलचे प्रदेश उपाध्यक्ष यांनी केला, यामुळे बैठकीत वातावरण गंभीर झाले आहे. त्यावेळी प्रदेशाध्यक्षांनी या गोष्टी चार भिंतीच्या आत सांगितल्या असता तर बरं झालं असतं असे सांगत कान टोचले.शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्षपदी शशिकांत शिंदे यांची नियुक्ती झाल्यानंतर प्रथमच ते नंदुरबार जिल्ह्यात आले होते. यावेळी विविध पदाधिकाऱ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यावेळी राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष तसेच आदिवासी सेलचे प्रदेश उपाध्यक्ष रवींद्र वळवी यांनी बैठकीत जिल्हाध्यक्ष यांच्या कार्यशैलीवर प्रश्न उपस्थित केला. त्यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, फादर बॉडी सेलच्या पदाधिकाऱ्यांना योग्य सन्मान देत नाहीत. तसेच राष्ट्रवादी पक्षातील पदाधिकारी आपल्या पक्षांमध्ये राहून आपल्या पक्षातील कार्यकर्त्यांना दुसऱ्या पक्षामध्ये प्रवेश देत असतात. अनेक महिन्यांपासून नियुक्ती झाल्यानंतरही जिल्हाध्यक्षांनी काहीच हालचाल केलेली नाही त्यामुळे अनेकांनी पक्ष बदलला.वळवी यांनी सांगितले की, मी तयार केलेल्या सेलचे पदाधिकाऱ्यांना भाजपात प्रवेश देण्यासाठी आपल्या पक्षातील पदाधिकाऱ्यांनीच पुढाकार घेतला. आपल्या पक्षात राहून काही पदाधिकारी भाजपासाठी काम करतात. एक पदाधिकारी तर भाजपाचा व्हाट्सअप ग्रुपच्या ॲडमिन आहे. असे काम होत असेल तर पक्ष वाढणार कसा? असा सवाल करीत सभागृहात असलेले कार्यकर्त्यांना आणण्यात आले आहे, असा आरोप केला. राष्ट्रवादी पक्ष हा नंदुरबार जिल्ह्यात शिगेला असताना आता मात्र झिरो झाला असल्याचे सांगत गोपनीय पद्धतीने पक्षाचे काम सुरू असून अशामुळे पक्ष वाढणार नाही, असे यावेळी त्यांनी सांगितले. त्यांच्या आक्रमक भाषणानंतर प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी त्यांचे कान टोचत या गोष्टी चार भिंतीच्या आड सांगितल्या असत्या तर बरं झालं असतं. असे सांगून फार वाढू नका असे सांगितले.यावेळी प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी सांगितले की, राष्ट्रवादीला भविष्य आहे त्यामुळे तिथे भांड्याला भांडे लागतात असे सांगत वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला. भविष्यात काही पक्ष संपणार असून राष्ट्रवादीचा उदय होणार आहे. राष्ट्रवादीच्या जीवावर अनेक नेते मोठे झाले मात्र जनता तशीच राहिली. लोक पक्ष सोडून गेले शिल्लक आम्ही व तुम्हीच आहोत त्यातही एकमेकांच्या कार्यक्रम आम्ही करतोय असे त्यांनी सांगितले. यावेळी माजी आमदार सुनील भुसारा यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

## मूल होत नसल्याने अंगारा लावून पेढा दिला, पुण्यात २६ वर्षीय विवाहितेकडून मांत्रिकाने ३ लाख उकळले



**पुणे :** मूल होत नसल्याच्या समस्येवर उपाय म्हणून मंत्रोच्चार आणि अंगारा लावून महिलेला पेढा देऊन एका मांत्रिकाने महिलेकडून तीन लाख १५ हजार रुपये उकळल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकारामुळे पुण्यात एकच खळबळ उडाली आहेसहकारनगर परिसरात हा प्रकार घडला असून, पोलिसांनी गिरीश बलभीम सुरवसे, वय ३६ वर्ष, रा. भोसरी, याच्यावर भारतीय न्याय संहिता व महाराष्ट्र नरबळी-जादूटोणा प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल केला आहे.या प्रकरणी बालाजीनगर परिसरात राहणाऱ्या एका २६ वर्षीय महिलेने तक्रार दिली आहे. आरोपी सुरवसे याला अटक करण्यात आली असून, त्याच्या एका साथीदाराचा शोध सुरू आहे. हा प्रकार २८ जुलै ते नऊ सप्टेंबर २०२५ या काळात घडला आहे.आरोपीने पीडितेला विश्वासात घेऊन मंदिरात नेले. तेथे मंत्रोच्चार करीत अघोरी विधी केल्याचे भासवले. त्यानंतर अंगाऱ्याचा पेढा खाण्यास देऊन सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा तीन लाख १५ हजारांचा ऐवज घेतला. आपली फसवणूक झाल्याच्या निदर्शनास आल्यानंतर पीडितेने तक्रार दिली. त्यानंतर सहकारनगर पोलिसांनी गुन्हा नोंदवला.अंधश्रद्धेला बळी पडू नका. कोणत्याही संशयास्पद व्यक्तीने जादूटोणा, अंगारे किंवा चमत्कारिक विधींच्या नावाखाली पैसे, दागिने मागितल्यास तत्काळ पोलिसांना कळवा,फ असे आवाहन पोलिसांनी नागरिकांना केले आहे.

# भारत-पाकिस्तान सामना होणारच, कितीही प्रयत्न करुन रद्द का होणार नाही, एकमेव कारण जाणून घ्या..

**दुबई :** भारत आणि पाकिस्तान यांच्यातील आशिया कपचा सामना रविवारी १४ सप्टेंबरला आयोजित करण्यात आला आहे. पण हा सामना होऊ नये, यासाठी भारतामध्ये बऱ्याच व्यक्ती कोर्टात जाऊन दाद मागत आहेत. पण कितीही व्यक्ती कोर्टात गेल्या तरीही हा सामना रद्द होऊ शकत नाही आणि त्याचे एक सर्वात मोठं कारण आता समोर आलं आहे.

भारत-पाक सामना रद्द करण्याचं कारण काय... भारत आणि पाकिस्तान यांच्यातील आशिया कपमधला सामना रद्द करावा, यासाठी भारतामध्ये बऱ्याच जणांनी कोर्टात याचिका दाखल करण्यात आली आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना आता फक्त दोन दिवसांवर येऊन ठेपला आहे,




एवढ्या कमी वेळात कोर्ट कसा काय निकाल देऊ शकतो, हे प्रथम समजून घ्यायला हवे. पाकिस्तानच्या दहशतवाद्यांनी भारतामधील निरपराध लोकांचा बळी घेतला आणि त्यामुळे भारताने पाकिस्तानबरोबर खेळू नये, असे म्हटले जात आहे. ऑपरेशन सिंदूरनंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यात एकही क्रिकेटचा सामना झालेला नाही आणि यापुढेही होऊ नये, असे कारण याचिकाकर्त्यांनी दाखल केले आहे.

**भारत-पाक सामना रद्द करण्याचं कारण काय...**

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील आशिया कपमधला सामना रद्द करावा, यासाठी भारतामध्ये बऱ्याच जणांनी कोर्टात याचिका दाखल करण्यात आली आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना आता फक्त दोन दिवसांवर येऊन ठेपला आहे, एवढ्या कमी वेळात कोर्ट कसा काय निकाल देऊ शकतो, हे प्रथम समजून घ्यायला हवे. पाकिस्तानच्या दहशतवाद्यांनी भारतामधील निरपराध लोकांचा बळी घेतला आणि त्यामुळे भारताने पाकिस्तानबरोबर खेळू नये, असे म्हटले जात आहे. ऑपरेशन भारत आणि पाकिस्तान यांच्यातील आशिया कपमधला सामना रद्द होऊ शकत नाही,

एक मोठं कारण म्हणजे भारत सरकारने या सामन्यांना मान्यता दिली आहे. ही मान्यता तेव्हाच दिली आली जेव्हा त्यांनी बीसीसीआयबरोबर बैठक घेतली आणि सर्व गोष्टी समजून घेतल्या. आंतरराष्ट्रीय कोणतेही सामने होत असतात, तर त्यांचे काही नियम असतात आणि ते नियम कोणीही मोडू शकत नाही. आंतरराष्ट्रीय क्रीडा संघटनेचे काही नियम असतात आणि त्यानुसार सर्व देशांना वागावं लागतं. समोरचा देश शत्रू असला तरी त्याला मैदानात सामना खेळणे भाग असते. आशिया कप ही आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा आहे, फक्त भारत आणि पाकिस्तान हे दोनच देश त्यामध्ये नाहीत. त्यामुळे भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांना हे नियम पाळावे लागतील आणि हा सामना खेळावाच लागेल. सिंदूरनंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यात एकही क्रिकेटचा सामना झालेला नाही आणि यापुढेही होऊ नये, असे कारण याचिकाकर्त्यांनी दाखल केले आहे.भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना रद्द करण्याचे बरेच प्रयत्न सध्या सुरु आहेत. पण हा सामना रद्द केला जाणार नसल्याचे आता समोर येत आहे. भारत आणि पाक यांच्यातील सामना रद्द का होऊ शकत नाही, याचे एकमेव सर्वात महत्वाचे कारण आता समोर आले आहे


# पाकिस्तानने भारताच्या सामन्यापूर्वीच हार मानली, कर्णधारानेच जगासमोर संघाची लाज काढली, म्हणाला..

**दुबई :** भारत आणि पाकिस्तान आता काही तासांतच एकमेंकासनोर उभे ठाकले जाणार आहेत. रविवारी आशिया कपमध्ये हा महामुकाबला होणार आहे. पण त्यापूर्वीच पाकिस्तानचा कर्णधार सलमान अली आघा याने आपल्या संघाची लाज जगामसोर काढली आहे. त्यामुळे आता भारताच्या सामन्यापूर्वीच पाकिस्तानने हार मानली का, अशी जोरदार चर्चा सर्वत्र सुरु झाली आहे.भारत आणि पाकिस्तान यांच्यातील आशिया कपमध्ये सामना होणार की नाही, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. पण




हा सामना होण्यापूर्वीच पाकिस्तानने भारतापुढे गुडघे टेकल्याचे आता समोर येत असल्याचे म्हटले जात आहे. कारण पाकिस्तानचा कर्णधार सलमानची एक मुलाखत प्रसिद्ध झाली आहे. या मुलाखीमध्ये त्याने आपल्या संघालाच घरचा आहेर दिल्याचे समोर आले आहे.कर्णधार सलमानच्या नेतृत्वाखाली पाकिस्तानने २२ टी २० सामने खेळले आहेत. या २० पैकी १२ सामन्यांत सलमानने पाकिस्तानला विजय मिळवून दिला आहे. पण सलमानच्या नेतृत्वाखाली पाकिस्तानला दोन मालिका गमवाव्या लागल्या आहेत. मार्च २०२५ मध्ये पाकिस्तानने सलमानला टी २० संघाच्या कर्णधारपदी नियुक्त केले होते. सलमान पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या स्पर्धेत खेळणार आहे.सलमान म्हणाला की, ङ्गङ्घ गेल्या दोन वर्षांपासून आपली कामगिरी चांगली झालेली नाही. पण पाकिस्तानच्या संघाला एक चांगली परंपरा होती, जी आपल्याला पुन्हा मिळवायची आहे. जर आपण भारत आणि अन्य संघांबरोब चांगली कामगिरी केली नाही तर चाहत्यांचा विश्वास आपल्यावर राहणार नाही. भारत आणि बाकीचे संघ आपल्यापेक्षा फारच जास्त पुढे निघून गेले आहेत. त्यामुळे आपण आपला स्तर उंचवायला हवा. माझ्यामते आपण अशी कामगिरी करायला हवी की, येणाऱ्या पिढीने आपला आदर्श डोळ्यापुढे ठेवायला हवा. पण सधाच्या घडीला तरी आपण फारच मागे आहोत. हा गॅप आपल्याला भरून काढायचा आहे आणि पुढे जायचे आहेत. ङ्घङ्घपाकिस्तानचा कर्णधार सलमानने आपल्याच संघाला आता आरसा दाखवला आहे. कारण आपण भारतापेक्षा भरपूर मागे आहोत, हे त्याने मान्य करत आपल्याच संघाची लाज सर्वांसमोर काढल्याचे म्हटले जात आहे.

# भारताने सामना जिंकला आणि सूर्याने मनं.. आऊट झालेल्या खेळाडूला नॉटआऊट का ठरवलं, जाणून घ्या कारण




**दुबई :** भारताने युएईबरोबरचा सामना जिंकला, पण मनं मात्र सूर्याने जिंकली. कारण युएईच्या एका खेळाडूला थेट पंचांनीच आऊट दिलं होतं. पण सूर्याने या खेळाडूला नाबाद ठरवलं आणि त्याला खेळण्याची संधी देत सर्वांची मनं जिंकली. पण सूर्याने ही गोष्ट का केली, याचं कारणही आता समोर आलं आहे.ही गोष्ट घडली ती १३ व्या षटकात. त्यावेळी भारताचा शिवम दुबे हा गोलंदाजी करत होता. या षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर ही गोष्ट घडली. शिवम दुबेचा सामना करत होता तो युएईचा जुनैद सिद्दिकी. शिवमच्या गोलंदाजीवर मोठा फटका मारण्याचा त्याचा मानस होता. शिवम दुबेने यावेळी शक्कल लढवली आणि त्याने यावेळी स्लो बाऊन्सर टाकला. हा चेंडू जुनैदच्या खांद्याच्या जवळून गेला, पण त्याच्या बॅटचा मात्र यावेळी संपर्क झाला नाही. त्यामुळे हा चेंडू थेट संजू सॅमसनकडे गेला. त्यानंतर जुनैद हा क्रीझच्या बाहेर उभा असल्याचे संजूने पाहिले आणि स्टम्पवर त्याने बॉल टाकला. त्यावेळी तिसऱ्या पंचांनी जुनैदला बाद दिले होते. पण सूर्याने यावेळी जुनैदला खेळायला द्यावं, अशी पंचांकडे विनंती केली आणि त्याला नाबाद ठरवलं.सर्वप्रथम सूर्याने सर्व परिस्थिती जाणून घेतली. जुनैद चेंडू खेळून क्रिझच्या बाहेर आला होता, कारण त्याला शिवम दुबेचा टॉवेल मैदानात पडलेला दिसला होता. जुनैद हा शिवम दुबेला त्याचा टॉवेल पडला आहे, हे सांगण्यासाठी पुढे आला होता, तो धाव घेण्यासाठी पुढे आला नव्हता. त्यामुळे जो प्रतिस्पर्धी खेळाडू आपल्या संघातील खेळाडूला मदत करत असेल त्याला कसं बाद करायचं, हा विचार सूर्याने केला आणि सर्वात महत्वाची ठरणारी खेळभावना दाखवत त्याने युएईच्या खेळाडूला नाबाद ठरवण्याचा निर्णय घेतल्याचे आता समोर आले आहे आणि त्यामुळेच सूर्याचे सर्वच कौतुक करत आहेत.भारत आणि युएई यांच्यातील सामना लवकरच आटोपला. युएईचा संघ ५७ धावांत ऑल आऊट झाला आणि भारताने फक्त २७ चेंडूंत हा सामना जिंकला. पण या सामन्यानंतर सर्वात जास्त कौतुक हे सूर्याचेच होताना दिसत आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# यंदाची दिवाळी होणार गोड! कपातीनंतर नोकरदारांना मोठं गिफ्ट मिळणार, ८ कोटी कर्मचाऱ्यांना होणार फायदा

**नवी दिल्ली :** कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना म्हणजे च्या आठ कोटी सदस्यांसाठी आनंदाची बातमी आहे. सरकारने अलीकडेच मध्ये सुधारणा करून देशवासीयांना महागाईपासून काही प्रमाणात दिलासा दिला आणि आता दिवाळीपूर्वी आणखी एक आनंदाची बातमी देण्याची जय्यत तयारी सुरू आहे. दिवाळीपूर्वी सुमारे ८ कोटी वापरकर्त्यांना काही फायदे देण्याची तयारी सरकार करत आहे. जीएसटी सुधारणांनंतर आता मेकओव्हरची तयारी आता सुरू आहे. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना ईपीएफओ सुधारणांची तयारी करत असून या बदलामुळे सर्वसामान्य नोकरदार लोकांना खात्यात बँक अकाउंटसारख्या सुविधा मिळू शकतील. ईपीएफओ ३.० सुविधा रोलआऊट करायची




तयारी सध्या राष्ट्रीय पातळीवर सुरु आहेकामगार आणि रोजगार मंत्री मनसुख मांडवीय यांच्या अध्यक्षतेखाली पुढील महिन्यात १०-११ ऑक्टोबर रोजी एक महत्त्वाची बैठक होणार आहे. इकॉनॉमिक टाइम्सच्या वृत्तानुसार, दिवाळीपूर्वी सरकार सुमारे ८ कोटी सदस्यांना मोठा दिलासा देऊ शकते. ईपीएफओमध्ये बदल होऊ शकतात, ज्यामुळे या सदस्यांना बँकेसारख्या सुविधा मिळू शकतील. पुढील महिन्यात होणाऱ्या बैठकीत ईपीएफओ ३.० सुविधा रोलआऊट केली जाऊ शकते, ज्याचा उद्देश बँकेसारख्या सुविधा सुरू करण्याचा आहे. यामध्ये किंवा व्यवहारांद्वारे पीएफचा काही भाग काढण्याचा पर्याय मिळू शकेल. त्याचवेळी, संघटनेच्या केंद्रीय विश्वस्त मंडळाकडून कामगार संघटनांच्या सततच्या मागणीला पूर्ण करून किमान पेन्शन दरमहा १,००० रुपयांवरून १,५०० ते २,५०० रुपयांपर्यंत वाढवण्याच्या प्रस्तावाचा आढावा घेण्याची शक्यता आहे.

३.० अंतर्गत केवळ एटीएममधून पीएफ विड्रॉल शक्य होणार नाही तर, गुगल पे, फोनपे किंवा पेटीएम सारख्या ॲप्सद्वारे पीएफ काढणे देखील शक्य होईल. म्हणजे आता तुम्हाला पीएफचा दावा करण्यासाठी किंवा खात्यात छोटे बदल करण्यासाठी पीएफ कार्यालयात जावे लागणार नाही, उलट तुम्ही घरबसल्या अगदी आरामात पीएफची कामे करू शकाल. तसेच त्याच्या मदतीने तुम्ही पीएफ खात्यातील शिल्लक आणि योगदान देखील ट्रॅक करणे शक्य होईल.या नवीन प्रणालीअंतर्गत सदस्यांना एटीएमसारखे कार्ड दिले जाईल, जे पीएफ अकाउंटशी लिंक्ड असेल. याद्वारे तुम्ही एटीएममधून पीएफ पैसे सहजपणे काढू शकाल. द्वारे पैसे काढण्यासाठी पीएफ खाते शी जोडले जावे लागेल.

याबाबत कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नसली तरी दीर्घकाळापासून सुरू असलेल्या मागण्या लक्षात घेता, सरकार पीएफ खातेधारकांना दिलासा देऊ शकते अशी अपेक्षा आहे. पीएफ काढणे सोपे झाल्याने आणि पेन्शनमध्ये वाढ झाल्याने लोकांकडून होणाऱ्या खर्चात वाढ होईल आणि वाढत्या वापराचा थेट फायदा अर्थव्यवस्थेला मिळेल

# शिवसेना उबाठाचा दसरा मेळावा शिवाजी पार्कमध्येच; मुंबई महापालिकेने दिली परवानगी

**मुंबई :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा दसरा मेळावा शिवाजी पार्क मैदानावर आयोजित करण्यासाठी गुरुवारी मुंबई महापालिकेकडून परवानगी देण्यात आली आहे. आगामी महापालिका तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या दसरा मेळाव्याला महत्त्व प्राप्त झाले आहे. शिवाय शिवसेना उबाठा आणि मनसे यांच्यातील संभाव्य सहकार्यामुळे हा मेळावा अधिक गाजण्याची शक्यता आहे.दसरा मेळाव्याला शिवाजी पार्क मैदानावर परवानगी मिळावी यासाठी शिवसेना उबाठा पक्षाच्या नेत्यांनी मुंबई महापालिकेशी पत्रव्यवहार केला होता.

त्या पत्रव्यवहाराला महापालिकेकडून उत्तर मिळाले असून, महापालिकेने या मेळाव्याला परवानगी दिली आहे. उद्धव ठाकरे यांच्यासह पक्षाचे प्रमुख नेते कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करतील. पक्षाचे नेते सचिन अहिर यांनी हा मेळावा न भूतो न भविष्यतिफ असा असेल, असे सूचक विधान




केले आहे.शिवसेनेच्या दसरा मेळाव्यासाठी वरळी डोम आणि आझाद मैदान या दोन्ही जागेची चाचपणी पक्षाच्या वतीने सुरू होती. मात्र आता आझाद मैदानात परवानगी मिळविण्यासाठी शिवसेनेने पत्रव्यवहार सुरू केला असून, शिवसेनेचा दसरा मेळावा आझाद मैदानावर होण्यावर जवळपास शिक्कामोर्तब झाले आहे.

वरळी डोममध्ये जागा कमी पडेल म्हणून आझाद मैदानाला पक्षाने पसंती दिल्याचे सांगण्यात येत आहे.आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अद्ययावत मतदार याद्या लवकरात लवकर प्रसिद्ध कराव्यात या मागणीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शिष्टमंडळ लवकरच निवडणूक आयोगाची भेट घेणार असल्याची माहिती पक्षाचे नेते बाळा नांदगावकर यांनी गुरुवारी दिली . पक्षांतर्गत असलेल्या बीएलओसह इतर नेमणुका त्वरित जाहीर करण्याची सूचनाही पक्षाचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी यावेळी दिल्याचे नांदगावकर यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना स्पष्ट केले. मुंबई महानगरपालिका निवडणुका आणि इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकींच्या पार्श्वभूमीवर राज ठाकरे यांनी पक्षाचे नेतेमंडळी आणि इतर प्रमुख पदाधिकाऱ्यांची विशेष बैठक शिवतीर्थ या त्यांच्या निवासस्थानी आयोजित केली होती.

# दारु ढोसून शिक्षक तर्राट; नशा चढली अन् वर्गातच पाय पसरुन झोपला, मोहगाव शाळेतील प्रकार

**गोंदिया:** देवरी तालुक्यातील मोहगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील एक शिक्षक चक्क दारू पिऊन वर्गातच झोपल्याचा धक्कादायक प्रकार



उघडकीस आला आहे. आर. एस. बहेकार असे या दारुड्या शिक्षकाचे नाव आहे.मोहगाव जिल्हा परिषद शाळेत दोन शिक्षक असून २२ विद्यार्थी शिकत आहेत. बहेकार यांना दारूचे व्यसन असल्याने वर्षभरापासून ग्रामस्थांनी त्यांना सुधारण्याची संधी दिली. तरीही त्यांच्यात सुधारणा झाली नाही. गुरुवारी बहेकार हे टेबलवर पाय ठेवून चक्क खुर्चीत झोपी गेले. मद्यधुंद अवस्थेत असल्याने नागरिक आल्याचेही त्यांना लक्षात आले नाही. संतप्त गावकऱ्यांनी या घटनेचा व्हिडीओ तयार करून सोशल मीडियावर व्हायरल केला. सोबतच वरिष्ठांना याविषयीची माहिती दिली. संबंधित शिक्षकाची चौकशी करून कारवाई करावी, अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे. गावातील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी शालेय वेळेत फिरत असल्याने गावकऱ्यांसह शाळेला अचानक भेट दिली. याचवेळी शिक्षक बहेकार दारू पिऊन खुर्चीवर झोपलेल्या अवस्थेत दिसले. शिक्षण क्षेत्रात मद्यपी शिक्षक असतील तर, विद्यार्थी काय धडे शिकतील. या शिक्षकावर कठोर कारवाई करण्यात यावी,फ अशी मागणी ग्रामपंचायत सदस्य हंसराज वालदे यांनी केली आहे.शाळेतील शिक्षकाचा हा प्रताप पाहून पालकांनीदेखील संताप व्यक्त केला आहे. ग्रामीण भागात शिक्षणाच्या सोयी उपलब्ध नसतात. त्यात अनेक नागरिक आर्थिकदृष्ट्या प्रबळ नसतात. त्यामुळे ग्रामीण भागातील मुलांना शिकवणे पालकांसमोर मोठे आव्हान असते.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# देढ फुट्यासाठी संजय नार्वेकर नव्हते पहिली पसंती, स्वत:च केला खुलासा; म्हणाले- संजू बाबाने बोलावलं म्हणून...



**मुंबई:** महेश मांजरेकर लिखित आणि दिग्दर्शित हा सिनेमा १९९९ साली प्रदर्शित झालेला. संजय दत्त आणि नम्रता शिरोडकर यांची मुख्य भूमिका असणाऱ्या या सिनेमात अनेक मराठी कलाकारांनी भूमिका केली होती. मात्र, देढ फुट्या ही संजय नार्वेकरांनी साकारलेली भूमिका विशेष गाजली. बॉलिवूडमधील कल्ट सिनेमांपैकी एक असणाऱ्या वास्तवमधील संजय यांच्या या पात्राची आजही चर्चा होते. अलिकडेच एका मुलाखतीत बोलताना त्यांना ही भूमिका कशी मिळाली याविषयी त्यांनी भाष्य केले. कारण या भूमिकेसाठी ते निर्मात्यांची पहिली पसंती नव्हते, एका लोकप्रिय अभिनेत्याची निवड करण्यात आलेली. मात्र देढ फुट्याची भूमिका संजय यांच्या नावावरच होती आणि हे कसे घडून आले, याविषयी त्यांनी भाष्य केले.सौमित्र पोटे यांच्या मित्र म्हणे या पॉडकास्टमध्ये बोलताना संजय नार्वेकर यांनी वास्तवमधील भूमिकेविषयी असे म्हटले की, त्यांचे ऑल द बेस्ट, अधांतरमधील काम महेश मांजरेकर यांनी पाहिलं होतं. त्यावेळी वास्तवच्या कास्टिंगची प्रक्रिया सुरू होती, त्यावेळी महेश यांनीच खरंतर संजय यांचे नाव निर्मात्यांना सुचवले. ही भूमिका खूप मोठी आहे, त्याकरता नावाजलेलीच व्यक्ती हवी,अशी भूमिका त्यावेळी निर्मात्यांनी घेतली होती. त्या बड्या कलाकाराचे देढ फुट्यासाठी कास्टिंगही झाल्याचे नार्वेकरांनी सांगितले. संजय पुढे म्हणाले की, तेव्हा मी रुईया कॉलेजच्या एकांकिका दिग्दर्शित करायचो, त्या नाक्यावर मी असायचो, तिथे कधी कधी महेशही असायचा. एक दिवस महेशने म्हटले की, संज्या तुझी संधी गेली रे, मी तुझं नाव सांगितलं होतं, पण नाही झालं. मला ती भूमिका केवढी मोठी आहे, तेही माहीत नव्हतं. म्हटलं ठीक आहे, जे नशिबात आहे तेच होईल.

नार्वेकरांनी सांगितलं की, एकदा ते असेच नाक्यावर चहा पित पित बसले होते. त्याकाळी मोबाइल नसल्याने तिथेच जवळ असणाऱ्या डीपी हॉटेलमध्ये मांजरेकरांनी फोन केला आणि सांगितले, जवळपास संजय असेल तर त्याला तातडीने मढ आयलंडला यायला सांगा. निरोप मिळताच संजयही मित्राची बाइक घेऊन तिथे पोहोचले.संजय म्हणाले की, मी तिथे पोहोचलो. महेश, प्रोड्युसर सगळे तिथे होते. तेव्हा कॅमेरा तपासून घेण्यासाठी एक सीन आधी शूट करायचे. कॅमेऱ्याचे फ्रेमिंग बरोबर आहे ना, तो लीक नाहीये किंवा काही बिघाड आहे का, हे सर्व तपासायला लागायचं. कारण त्याकरता पैसा खूप लागायचा. आधी २-३ मिनिटांचं शूट करायचे, ते डेव्हलप करायचे, मग बघायचे आणि कॅमेरामनने ओके सांगितल्यावर कॅमेरा अंतिम केला जायचा, अशी प्रक्रिया होती. तसा एक सीन मी केला.

# पंजाबमधील १५०० कुटुंबांसाठी शाहरुख खान ठरला देवदूत; पूरग्रस्तांसाठी पुढे केला मदतीचा हात



**मुंबई:** पंजाबमधील पूरस्थितीमुळे राज्यातील जवळपास २३ जिल्ह्यांमध्ये बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे. मुसळधार पावसामुळे नद्यांना पूर आला आहे, तर धरणांमधून जास्त पाणी सोडण्यात आले. या नैसर्गिक संकटात १६०० हून अधिक गावांना फटका बसला असून लाखो नागरिकांना नुकसान सहन करावे लागले, शेतीचेही मोठे नुकसान झाले आहे. गेल्या तीन दशकातील या सर्वात मोठ्या पूरस्थितीमध्ये कोणी घर गमावले, तर कोणी जमीन... गावच्या गावं यामध्ये उद्ध्वस्त झाली आहेत. सरकारने मदत आणि पुनर्वसनासाठी तात्काळ मदत निधी जाहीर केला असून, पंजाबमधील अनेक सेलिब्रिटींनी पूरग्रस्तांना मदतीचा हात पुढे केला आहे. बॉलिवूडमधीलही अनेक दिग्गज सेलिब्रिटी मदतीचा हात पुढे करत आहेत. आता अभिनेता शाहरुख खान याने मदत जाहीर केली आहे.शाहरुखची नॉन प्रॉफिट संस्था असणाऱ्या मीर फाउंडेशनने मदतीचा हात पुढे केला आहे. स्थानिक सह हातमिळवणी करुन या संस्थेने काही मूलभूत आणि आवश्यक गोष्टींच्या किटचे वाटप केले. यामध्ये औषधे, स्वच्छतेसंर्भात लागणारे साहित्य, अन्नपदार्थ, मच्छरदाण्या, ताडपत्री, फोल्डिंग बेड, गाद्या आणि इतर आवश्यक वस्तूंचा समावेश आहे. या अंतर्गत अमृतसर, पटियाला, फाजिलका आणि फिरोजपूर जिल्ह्यातील १५०० कुटुंबांपर्यंत मदत पोहोचवली जाणार आहे. ज्याद्वारे या कुटुंबांना त्यांचे जीवन पुन्हा उभारण्यास मदत होईल.या कुटुंबीयांना संस्थेअंतर्गत त्यांना तात्काळ आरोग्य, सुरक्षितता आणि निवारा संदर्भातील गरजा पुरविण्याचे ध्येय आहे. याशिवाय काही दिवसांपूर्वी समोर आलेल्या मीडिया रिपोर्टमध्ये असा दावा करण्यात आला होता की शाहरुख अमृतसरमधील पुरामुळे बाधित झालेल्या ५०० घरांना दत्तक घेणार आहे.

# पोलीस कोठडीत, पण रील्सवर लाईक्सचा पाऊस

**सोलापूर :** बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील लुखामसलाचे माजी उपसरपंच गोविंद बर्गे यांनी सोलापूर जिल्ह्यातील सासुरे, ता बार्शी, येथे येऊन आत्महत्या केल्याच्या घटनेने महाराष्ट्रात खळबळ उडाली आहे. कलाकेंद्रातील नर्तकी पूजा गायकवाड हिच्यावरील प्रेमातून आलेल्या नैराश्यामधून बर्गेनी स्वत:वर गोळी झाडून आत्महत्या केल्याचा आरोप आहे. पोलिसांनी हिला मुख्य संशयित म्हणून ताब्यात घेतले असून सध्या ती पोलीस कोठडीत आहे. दरम्यान सोशल मीडियावरील इन्स्टाग्रामवर वेगवेगळे व्हिडीओ तयार करून रिल्स करणाऱ्या पूजा गायकवाडचे दोन दिवसांपूर्वी केवळ ५०० ते ७०० फॉलोअर्स होते. मात्र गोविंद बर्गेनी आत्महत्या केल्यानंतर दोन दिवसांत पूजाच्या फॉलोअर्समध्ये मोठी वाढ झाली आहे.पूजा गायकवाड हिच्या इन्स्टाग्रामवर फॉलोअर्समध्ये अचानक वाढ झाल्याचे दिसून आले आहे. दोन दिवसांत हा आकडा १८ हजारांवर पोहोचला आहे. दोन दिवसांपूर्वी जेमतेम ५०० ते ७०० वर असलेला आकडा आज १२ सप्टेंबर रोजी सकाळी सात वाजेपर्यंत जवळपास ४५ पटींनी वाढून २२ हजार ७०० च्या पलिकडे गेला आहे. दररोज दिवसभरात फॉलोअर्स हजारोंच्या संख्येने वाढ होतच चालली आहे. याला कारण ठरले आहेत तिचे व्हायरल होणारे व्हिडिओ.इंस्टाग्रामवर पूजाचे नृत्य करतानाचे अनेक व्हिडिओ पाहायला मिळत आहेत. तर गोविंद बर्गेच्या मृत्यूपूर्वीच तिने इंस्टाला ठेवलेली स्टोरी देखील चर्चेत आहे. माझ्याकडे तुझ्यासारखे चार आहेत, अशा आशयाचा व्हिडिओ रीलही दिसून येतो. पूजाने आपल्या इंस्टा अकाऊंटवरुन आत्तापर्यंत ३० पोस्ट केल्या असून व्हिडिओमध्ये ती डान्स करताना, ५०० रुपयांच्या नोटासह रिल्स बनवताना दिसून येत आहेगोविंद बर्गे यांनी नर्तकी पूजा गायकवाडवर पैसे, सोनं सगळं काही उधळलं होतं. तिने जे जे मागितलं ते सगळं तिला दिलं. पण, जेव्हा पूजाने गोविंदचं घरचं मागितलं तेव्हा गोविंदला धक्का बसला. त्याने पूजाला राहतं घर देण्यास नकार दिला. त्यामुळे चिडलेल्या पूजाने त्याच्याशी बोलणं बंद केलं. कालपर्यंत आपलं ऐकणारी पूजा अचानक अशी का वागतेय, हे गोविंद बर्गेंना समजेनासं झालं.चार ते पाच दिवस झाले. पूजा गोविंद यांचा फोन घेत नव्हती. एवढंच नाहीतर तिने गोविंदला बलात्काराचा गुन्हा दाखल करण्याची धमकी सुद्धा दिली होती. पूजाने धमकी दिल्यामुळे गोविंद हे उद्विग्न झाले होते. त्यामुळे गोविंद हे गेवराईतून निघाले आणि बार्शीतील वैराग इथं येऊन आत्महत्या केल्याने सोलापूर आणि बीड जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.पूजा गायकवाडला वैराग पोलिसांनी ताब्यात घेतले असून सध्या ती पोलीस कोठडीत असून पोलीस कसून तपास करत आहेत.

# शेगाव येथे होणाऱ्या राष्ट्रीय महाआरोग्य मेळाव्याचे राष्ट्रपती द्रौपदी मूर्मु यांना निमंत्रण...

जनसंचलन/बुलढाणा

संतनगरी शेगाव येथे होऊ घातलेल्या राष्ट्रीय आरोग्य महामेळाव्याच्या उद्घाटन कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासंदर्भातील निमंत्रण राष्ट्रपती द्रौपदी मूर्मु यांना केंद्रीय आयुष (स्वतंत्र प्रभार) आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी गुरुवारी दिल्ली येथे राष्ट्रपती भवनात स्नेहपूर्वक भेट घेऊन दिले. जिल्ह्यातील शेगाव येथे नोव्हेंबर २०२५ मध्ये राष्ट्रीय महाआरोग्य मेळावा आयोजित करण्यात येणार आहे. या राष्ट्रीय महाआरोग्य मेळाव्याचे उद्घाटन राष्ट्रपतींच्या हस्ते व्हावे, अशी विनंती गुरुवारी ११ सप्टेंबर रोजी केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केली. राष्ट्रपती द्रौपदी मूर्मु यांच्यासोबत आयुर्वेद आणि आरोग्य या विषयावरही चर्चा केली. आयुष मंत्रालयातर्फे आयोजित या राष्ट्रीय पातळीवरील या महा आरोग्य मेळाव्याचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी, सिद्ध, सोवा-रिग्पा आणि होमिओपॅथी या भारतीय पारंपरिक पद्धतींची समृद्ध परंपरा, वैज्ञानिक भक्कम पाया आणि जनकल्याणकारी स्वरूप जनतेसमोर सादर करणे होय.




१.प्रतिबंधात्मक, प्रोत्साहक आणि उपचारात्मक आरोग्यातील आयुष प्रणालींचे प्रदर्शन
२.सार्वजनिक आरोग्य जागरूकता आणि निरोगी जीवनशैलीचा प्रचार
३.संशोधन व ज्ञान विनिमय यासाठी विद्वान, संशोधक, विद्यार्थी आणि शेतकऱ्यांना व्यासपीठ
४.उद्योग व उद्योजकता संधी औषधी वनस्पती उत्पादक, ५.एमएसएमइ आणि स्टार्टअप्ससाठी प्रोत्साहन
६.विशेष चर्चासत्रे राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांत आयुष समन्वय, फिट इंडिया मूव्हमेंट, पर्यावरणपूरक आरोग्यसेवा, पारंपरिक औषधज्ञान संवर्धन

बुलढाणा हा जिल्हा राष्ट्रमाता जिजाऊ यांची जन्मभूमी आणि संत गजानन महाराजांची यांची समाधीभूमी, तसेच जागतीक दर्जाचे लोणार सरोवरासारख्या अनोख्या नैसर्गिक वारशा असलेली भुमी आहे येथे ऐतीहासीक ,अध्यात्म, परंपरा आणि विज्ञान यांचा संगम साधणारे हे ठिकाण या राष्ट्रीय महाआरोग्य सोहळ्यासाठी सर्वोत्तम स्थळ आहे. राष्ट्रपतींच्या उपस्थितीने हा कार्यक्रम अधिक प्रेरणादायी ठरेल,फ्फ असा विश्वास केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी व्यक्त केला आहे.

# नागरिक केंद्रीत आपले सरकार २.० पोर्टल कार्यान्वित करावे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

वृत्तसंस्था/मुंबई



नागरिकांना शासकीय सेवा व योजनांचा लाभ सहज व सुलभ पद्धतीने मिळण्यासाठी राज्य शासनाने आणखी एक पाऊल पुढे टाकले आहे. तंत्रज्ञानाचा उपयोग करीत नागरिकांना जास्तीत जास्त सुलभ पद्धतीने योजनांचे लाभ आणि सेवा देण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. सह्याद्री अतिथीगृह येथे समग्र संस्थेसोबत आयोजित गव्हर्नन्स प्रोसेस री इंजीनियरिंग बाबत बैठक झाली. शासनाच्या संपूर्ण सेवा आणि योजनांचे लाभ ङ्गआपले सरकारफ्वा पोर्टलवरून देण्यात यावेत. या पोर्टलवर अन्य विभागांचे पोर्टल किंवा ॲप एकत्रित करावे, असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. बैठकीस माहिती व तंत्रज्ञान मंत्री ॲड आशिष शेलार, मुख्य सचिव राजेश कुमार, राज्य सेवा हक्क हमी आयोगाचे मुख्य आयुक्त मनुकुमार श्रीवास्तव उपस्थित होते. गव्हर्नन्स मध्ये सुधारणा करीत नागरिकांचे इज ऑफ लिव्हिंग सुधारण्यासाठी राज्य शासन कार्य करीत आहे. प्रत्येकाला योजनांचा लाभ, शासकीय सेवा कमी कालावधीत, विनासायास मिळण्यासाठी नागरिक केंद्रीत आपले सरकार २.० पोर्टल तंत्रज्ञानस्नेही बनवीत २ ऑक्टोबरपर्यंत कार्यान्वीत करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. नागरिकांना देण्यात येणारा लाभ, सेवा मिळण्यामध्ये सहजता आणण्यासाठी करावयाच्या बदलांचे २६ नोव्हेंबर संविधान दिन, २६ जानेवारी २०२६ प्रजासत्ताक दिन आणि १ मे २०२६ महाराष्ट्र दिन अशा तीन टप्प्यातील वेळापत्रकानुसार कार्यवाही करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

# मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानांतर्गत गावांच्या विकासासाठी लोकसहभाग वाढवावा- केंद्रीय राज्यमंत्री रक्षाताई खडसे

जनसंचलन/मलकापूर

शासकीय योजनांच्या प्रभावी व जलदगतीने अंमलबजावणीसाठी राबविण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानांतर्गत गावांच्या विकासासाठी लोकसहभाग वाढवावा, असे प्रतिपादन केंद्रीय क्रीडा युवक कल्याण राज्यमंत्री रक्षाताई खडसे यांनी केले. केंद्रीय क्रीडा व युवक कल्याण राज्यमंत्री रक्षाताई खडसे यांच्या प्रमुख उपस्थितीत ग्रामविकास व पंचायतराज विभागाच्यावतीने मलकापूर येथील कृषी उत्पन्न बाजार समिती तालुकास्तरिय कार्यशाळा पार पडली. त्यावेळी त्या बोलत होत्या. या कार्यशाळेला सहपालकमंत्री ना. संजय सावकारे, कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर, आमदार चैनसुख संचेती, मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, पदाधिकारी आणि तालुक्यातील सरपंच, ग्रामसेवक, आशा सेविका, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.केंद्रीय राज्यमंत्री रक्षाताई खडसे म्हणाल्या, देशाला समृद्ध करायचे असेल तर त्याची सुरुवात आपल्या ग्रामपंचायतपासून झाली पाहिजेत. या अभियानात लोकसहभाग असणे गरजेचे आहे. त्याशिवाय गावाचा विकास शक्य नाही. या अभियानांतर्गत राज्य शासनाने ग्रामपंचायत ते राज्यस्तरापर्यंत १५ लाख ते ५ कोटी रुपयापर्यंतची बक्षिसे जाहीर केली आहे. या रकमेतून ग्रामपंचायतींचा सर्वांगिण विकास करुन नागरिकांना दर्जेदार सुविधा देणे शक्य होणार आहे. त्यामुळे ग्रामपंचायत स्तरावरील सरपंच, ग्रामसेवक, आशा सेविका, आरोग्य सेवक यांसह प्रशासनातील अधिकारी, कर्मचाऱ्याने कसोशीने प्रयत्न करुन हा अभियान राबवावा. ग्रामपंचायतीच्या विकासासाठी ही संधी आहे. त्याचा लाभ नागरिकांपर्यंत पोहचविण्यासाठी प्रयत्न करा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर म्हणाले, या योजनेचा जास्तीत जास्त लाभ गावकरी, सरपंच, ग्रामसेवकांनी करुन घ्यावा, ही संधी आहे. या अभियानाच्या माध्यमातून गाव हरित, स्वच्छ आणि लोकाभिमूख करायचे आहे. ग्रामपंचायत ते संसद अशी या अभियानाची संकल्पना आहे. या अभियानाच्या माध्यमातून गावाचा विकास करण्याची संधी असून लोकसहभागाने एकत्रित येवून अभियान राबवावे, असे आवाहन त्यांनी केले. सहपालकमंत्री ना. संजय सावकारे म्हणाले, केंद्राच्या धर्तीवर राज्यात हे अभियान राबविले जात आहे. महाराष्ट्राच्या अनेक योजना देशपातळीवर स्वीकारल्या गेल्या. महात्मा गांधी यांनी खेड्याकडे चला हा संदेश दिला. आज तरुण शहरांकडे जात आहेत. त्याचे कारण सोयीसुविधा हा आहे. या सोयीसुविधा ग्रामपंचायत स्तरावर दिल्यास हा शहराकडील ओढा कमी होईल. यासुविधा निर्माण करण्यासाठीच मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राबविले जात आहे. या अभियानांतर्गत नागरिकांना सर्व सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याचे काम होणार आहे. त्यासाठी लोकसहभाग महत्त्वाचा आहे. ग्रामसेवक आणि सरपंचांनी लोकहितासाठी प्रामाणिकपणे कामे करावे, जी लोकांच्या स्मरणात राहतील. या अभियानातील सर्व घटकातील कामे करण्यासाठी सहभाग घ्यावा. गावांच्या विकासासाठी पुढाकार घ्या, असे आवाहन सहपालकमंत्री ना. सावकारे यांनी केले. यावेळी आमदार चैनसुख संचेती यांनी मनोगत व्यक्त करुन मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियान यशस्वी करण्याचे आवाहन केले. मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात म्हणाले, या अभियानात



जनतेचा सहभाग अतिशय महत्त्वाचा आहे. या अभियानातील घटकाची कामे ही कालबद्ध पद्धतीने करायची आहे. या अभियानात गावातील महिला, पुरुष, तरुणांचा सहभाग वाढवून लोकचळवळ निर्माण करण्याचे केले. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान ही गाव समृद्ध करण्याची ही संधी मिळाली असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यशाळेचे प्रास्ताविक गटविकास अधिकारी बी.बी. हिवाळे यांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाविषयी माहिती दिली. तसेच यशदाचे प्रविण चव्हाण यांनी या अभियानाची रुपरेषा सादरीकरणाद्वारे विषद केली.

# बुलढाण्यात तोतया च्या घरी नागपूर आयकर विभागाचा छाप..

## कर्मचाऱ्यांचे बोगस क्लेम करून ४०० कोटी रुपयांचा आयकर विभागाला लावला चुना.

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा शहरातून एक बिग ब्रेकिंग समोर आली आहे.नागपूर येथील आयकर विभागातील अधिकाऱ्यांच्या एका पथकाने ४ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास बुलढाणा शहरातील एका तोतया च्या घरी छापा मारून कॉम्प्युटर, हार्ड डिस्क व अन्य साहित्य जप्त केले आहे..हा तोतया आपल्या विष्णू निवासस्थानात बसून मुळे खात शासकीय कर्मचाऱ्यांचे फॉर्म नंबर १६ चे आयकर रिटर्न भरून त्यात बोगस क्लेम दाखल करत होता.क्लेम भरल्यानंतर कर्मचाऱ्याला आयकर विभागाकडुन मिळालेल्या क्लेम मधून ३० टक्के कमिशन घेत होता.या तोतया ने जवळपास २ हजारांच्या वर फॉर्म १६ भरून व




बोगस क्लेम करून ४०० कोटी रुपयांचा चुना आयकर विभागाला लावल्याची खात्रीलायक वृत्त हाती लागली आहे..या कमिशन मधून या तोतया ने करोडोंची प्रॉपर्टी जमवली आहे..बुलढाणा सह आसपासच्या व पुण्यात या तोतया ने प्रॉपर्टी जमवली आहे.. असे असतानांही छापा टाकणाऱ्या नागपूर आयकर विभागाच्या अधिकाऱ्यांनी या तोतया ला अटक केली नाही हे विशेष.. म्हणून आयकर विभागाच्या अधिकारी आणि तोतया मध्ये कोट्यवधी रुपयांची तडजोड झाल्याची चर्चा रंगत आहे.. विशेष म्हणजे ज्या शासकीय कर्मचाऱ्यांनी बोगस क्लेम करून घेत आयकर विभागाला कोट्यवधी रुपयांचा चुना लावला आहे.ते देखील दोषी आहेत.या गंभीर प्रकरणात चौकशी होणे गरजेचे आहे.

# मिरची कोणाला झोंबली? १२ गुंठे शेतातील सिड प्लॉट कापला!



**जनसंचलन/ लोणार**

लोणार तालुक्यातील भुमराळा येथील शेतकरी संतोष डिगांबर भोसले यांच्या १२ गुंठे शेतातील मिरची सीड प्लॉट अज्ञात व्यक्तीने रात्रीच्या वेळी कापून टाकल्याचा प्रकार समोर आला आहे. त्यामुळे शेतकऱ्याचे लाखोंचे नुकसान झाले. सकाळी जेव्हा शेतकरी संतोष भोसले शेतात गेले तेव्हा मिरची ची झाडे बुडातून कापल्याचा प्रकार समोर आला. याप्रकरणी शेतकरी भोसले यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी पंचनामा केल असून मिरची प्लॉट कापून टाकणाऱ्याचा शोध घेत आहेत. शेतकरी संतोष भोसले यांनी आपल्या १२ गुंठे शेतात शेड नेट मध्ये मिरचीचां सीड प्लॉट लागवड केला होता.जवळपास ६५० झाडाची लागवड केलेली असताना त्याचे क्रॉसिंग सुरू होते. काही दिवसांनी हातात उत्पन्न सुद्धा येणार होते. मात्र कुणीतरी व्यक्तीने विळ्याच्या सहाय्याने संपूर्ण मिरची प्लॉट कापून टाकला आहे. त्यामुळे त्यांचे चार ते पाच लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.

# एकजूट शिक्षक, सशक्त समाजाची निर्मिती करू शकतो- राहुल नरवाडे

**वृत्तसंस्था/ अकोला**

डॉ बाबासाहेब आंबेडकर टिचर्स असोसिएशन (डाटा), जिल्हा शाखा अकोलाच्या वतीने सीताबाई महाविद्यालय, अकोला च्या सभागृहात डाटाचे एकदिवसीय जिल्हा अधिवेशन विभागीय सचिव डॉ एम आर इंगळे यांच्या मार्गदर्शनात पार पडले. त्याप्रसंगी उद्घाटक म्हणुन बोलतांना मा. राहुल नरवाडे यांनी वरील प्रतिपादन केले. याप्रसंगी विचारपिठावर अधिवेशनाध्यक्ष म्हणुन डाटाचे विभागीय सहसचिव डॉ कल्याण साखरकर होते. स्वागताध्यक्ष म्हणुन डाटा संघटनेचे अकोला जिल्हा अध्यक्ष डॉ प्रसन्नजीत गवई होते. प्रमुख उपस्थिती माजी सिनेट सदस्य डॉ प्रफुल्ल गवई, अमरावती. डाटा संघटनेचे माजी जिल्हाध्यक्ष डॉ संदिप भोवते, डॉ वर्षा सुखदेवे, प्राचार्य डॉ धनंजय तळवणकर, प्राचार्य डॉ विलास तायडे उपस्थित होते. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पन करण्यात आले. त्यांनतर डॉ नाना भडके यांनी स्वरचित संघटनेवर आधारीत स्वागत गीत मान्यवरांसाठी गायले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष डॉ प्रसेन्नजीत गवई यांनी केले प्रास्ताविकात त्यांनी संघटनेच्या आजपर्यंत केलेल्या कार्याचा आलेख मांडला आणी संघटेची पुढील वाटचाल कशी राहील याविषयी मार्गदर्शन केले. उद्घाटकीय भाषन करतांना मा. राहुल नरवाडे यांनी डाटा संघटनेची आवश्यकता प्रतिपादन करताना सर्वांनी एकजुटीने संघटीत होण्याचे आवाहन केले. तसेचं विद्यार्थी वर्गाला देखील यामाध्यमातून संघटीत करुन विद्यार्थ्यांची देखील संघटना बळकट करता आली तर पुढील पिढीचे भविष्य निश्चितचं उज्वल बनू शकते. असे प्रतिपादन केले. उद्घाटकीय सत्राचे सूत्रसंचालन विशाल नंदागवळी तर आभारप्रदर्शन प्रा. राहुल माहुरे यांनी केले. द्वितीय सत्रात शैक्षणिक व सामाजिक चळवळ : आव्हाने आणि उपाय या विषयावर परिसंवाद संपन्न झाला. परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध विचारवंत माजी परीक्षा नियंत्रक डॉ. भीमराव वाघमारे होते. प्रमुख वक्ते म्हणून डॉ रवींद्र मुंद्रे, सिनेट सदस्य, सं गा बा अम विद्यापीठ अमरावती हे होते.प्रमुख वक्ते म्हणुन बोलतांना त्यांनी विषयाला अनुसरून सखोल आणि अभ्यासपूर्ण मांडणी केली. आपल्यासमोरील नवीन शैक्षणिक धोरणामुळे निर्माण केलेली आव्हाने स्पष्ट केलीत. त्यासाठी आपल्या सर्वांची एक शिक्षक, विद्यार्थी समाजाचा घटक म्हणून काय जबाबदारी आहे. हे सविस्तर स्पष्ट केले. अध्यक्षीय भाषणात डॉ बी आर वाघमरे यांनी विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संघटनेचे सांगितलेले महत्व स्पष्ट केले. या द्वितीय सत्राचे सूत्रसंचालन डॉ अशोक इंगळे आभारप्रदर्शन डॉ मनोहर वासनिक यांनी केले. सत्कार समारंभ व समारोपीय सत्राचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ आर. डी. सिकची यांनी भूषविले. यामध्ये सेवानिवृत्त प्राध्यापक, नेट-सेट, पीएच. डी. तथा पीएच. डी. मार्गदर्शक व ज्यांनी शैक्षणिक,सामाजिक सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले त्याबद्दल जिल्ह्यातील एकूण ७० मान्यवरांचा सत्कार डाटा संघटनेच्या वतीने करण्यात आला सत्काराचे स्वरपन सन्मानचिन्हे, शाल, प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ या स्वरुपात होते. या प्रसंगी विचारपिठावर एकूण १० प्राचार्य उपस्थित होते हे विशेष यामध्ये प्राचार्य डॉ रामेश्वर भिसे, प्राचार्य डॉ जी. जी. गोंडाणे, प्राचार्य डॉ धनंजय तळवनकर, प्राचार्य डॉ सुनील पांडे, प्राचार्य डॉ किरण खंडारे, प्राचार्य डॉ विलास तायडे, प्राचार्य डॉ निरज अंभोरे, प्राचार्य डॉ भास्कर पाटील, प्राचार्य डॉ विनोद इंगळे उपस्थित होते. याप्रसंगी डॉ धनंजय तळवनकर, डॉ आर एम भिसे, डॉ सुनिल पांडे, यांची समयोचीत भाषणे झाली. समारोपीय सत्राच्या अध्यक्षीय भाषणात डॉ आर डी सिकची यांनी संघटनेच्या कार्याचे कौतुक केले. भविष्यात अशाचं प्रकारचे कार्य संघटनेने करावे अशी आशा व्यक्त केली.



कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन ॲड. वैष्णवी हागोणे व प्रा. राहुल माहुरे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ मनिषा कांबळे यांनी केले. कार्यक्रमासाठी जिल्ह्यातील व जिल्हा बाहेरील मान्यवर मंडळी, संशोधक, अभ्यासक, शिक्षक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डाटाचे डॉ. प्रसन्नजीत गवई, डॉ विनोद खैरे,डॉ अशोक इंगळे, प्रा.राहुल माहुरे, प्रा. अनिल निंबाळकर, डॉ हरिचंद नेरटी, डॉ प्रीती इंगळे, प्रा. प्रकाश गवई, डॉ बाळकृष्ण खंडारे, डॉ निरज अंभोरे, प्रा. राहुल घुगे व सीताबाई महाविद्यालयातील सर्व शिक्षक तथा संपूर्ण कार्यकारिणीतील सदस्यांनी अथक परिश्रम घेतले आणि अधिवेशन यशस्वी केले.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८